**परराष्ट्र व्यवहार मंत्री रशिया भेटीवर (19 - 21 ऑगस्ट 2025)**

22 ऑगस्ट 2025

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर हे 19-21 ऑगस्ट 2025 दरम्यान रशियाच्या औपचारिक भेटीवर होते. या भेटीत त्यांनी भारत-रशिया व्यापार, आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक सहकार्यावरील आंतरशासकीय आयोगाच्या (IRIGC-TEC) 26व्या अधिवेशनाचे सह-अध्यक्षस्थान भूषविले.

2. या भेटीदरम्यान, EAM यांनी रशियाचे अध्यक्ष महामहिम श्री. व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतली. रशियाचे प्रथम उप-पंतप्रधान महामहिम श्री. डेनिस मंटुरोव आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री महामहिम श्री. सर्गेई लावरोव्ह यांच्याशी देखील चर्चा केली. EAM यांनी प्रमुख अभ्यासक आणि विचारवंत यांच्यासोबत देखील संवाद साधला.

3. राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यासोबत झालेल्या भेटीदरम्यान, EAM यांनी पंतप्रधानांच्या वतीनं शुभेच्छा कळविल्या. द्विपक्षीय अजेंडाच्या प्रमुख मुद्द्यांवर आणि युक्रेनशी संबंधित घडामोडींसह परस्पर हिताच्या समकालीन जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली.

4. 20 ऑगस्ट रोजी, EAM यांनी प्रथम उप-पंतप्रधान महामहिम श्री. डेनिस मंटुरोव यांच्यासोबत IRIGC-TEC च्या 26व्या सत्राचे सह-अध्यक्षस्थान भूषवले. वर्ष 2030 पर्यंत सुधारित द्विपक्षीय व्यापार लक्ष्य 100 अब्ज डॉलर्स विहित वेळेत साध्य करण्यासाठी शुल्क आणि नॉन-शुल्क व्यापार अडथळ्यांचा सामना करणे, लॉजिस्टिक्स मधील अडथळे दूर करणे, कनेक्टिव्हिटीला चालना देणे, पेमेंट यंत्रणा सुरळीतपणे प्रभावी करणे, वर्ष 2030 पर्यंत आर्थिक सहकार्य कार्यक्रमाचे वेळेवर फलनिष्पत्ती आणि अंमलबजावणी, संदर्भ अटी अंतिम करण्यात आलेल्या भारत-युरेशियन आर्थिक संघ FTA ची उचित फलनिष्पत्ती, उभय देशांच्या व्यवसायांमधील नियमित संवाद अशा प्रमुख मुद्द्यांचा चर्चेत समावेश होता.

5. व्यापार आणि गुंतवणुकीद्वारे ऊर्जा सहकार्य टिकवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. भारतीय कुशल कामगारांच्या विशेषतः आयटी, बांधकाम आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील गतिशीलतेवर चर्चा झाली. उद्घाटन सत्राच्या समाप्तीनंतर सह-अध्यक्षांनी IRIGC-TEC च्या 26व्या सत्रासाठी एका प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली.

6. IRIGC-TEC बैठकीनंतर झालेल्या भारत-रशिया बिझनेस फोरमला परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि महामहिम श्री मंटुरोव यांनी संबोधित केले.  या फोरममध्ये उभय बाजूंच्या अधिकाऱ्यांसह व्यवसाय आणि उद्योगांच्या प्रतिनिधींसह विविध भागधारकांचा सहभाग होता.  बिझनेस फोरम आणि IRIGC वेगवेगळ्या कार्यगटांमध्ये ही महत्वपूर्ण समन्वय यंत्रणा असल्याचे मानले जाते.

7. ऑगस्ट 21 रोजी, EAM यांनी महामहिम श्री. सर्गेई लावरोव्ह यांची भेट घेतली आणि भारत-रशिया द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण क्षेत्रांचा व्यापक आढावा घेतला. ज्यामध्ये व्यापार आणि आर्थिक सहकार्य, विविध कनेक्टिव्हिटी उपक्रम, राजकीय, संरक्षण आणि लष्करी-तांत्रिक सहकार्य, कझान आणि येकातेरिनबर्ग येथे दोन नवीन भारतीय वाणिज्य दूतावास उघडण्याच्या कार्यवाहीला गती देणं इ. मुद्द्यांचा चर्चेत  समावेश होता.  जागतिक आणि बहुपक्षीय सहकार्यावर उभय बाजूंनी जागतिक प्रशासनातील सुधारणा आणि G20, BRICS व SCO मध्ये सहकार्यासाठी त्यांच्या सामायिक वचनबद्धतेची पुष्टी केली.  समकालीन वास्तव प्रतिबिंबित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा विस्तार आणि ऊर्जा वाढवण्याची आवश्यकता EAM यांनी अधोरेखित केली.

8. युक्रेन, मध्य पूर्व, पश्चिम आशिया आणि अफगाणिस्तान मधील प्रादेशिक घडामोडींवर चर्चा झाली. मतभेद सोडवण्यासाठी संवाद आणि राजनयिकतेवर भर देण्याच्या भारताच्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार EAM यांनी केला.  परराष्ट्र मंत्री यांनी रशियन सैन्यात सेवा देणाऱ्या भारतीयांचा मुद्दाही उपस्थित केला आणि प्रलंबित प्रकरणांचे जलद निराकरण होण्याची आशा व्यक्त केली.

9. दहशतवादावर, उभय बाजूंनी दहशतवादाच्या सर्व अभिव्यक्ती आणि प्रकारांच्या विरोधात एकत्रितपणे लढण्याचा संकल्प केला.  दहशतवादाविरुद्ध - शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारण्याचा आणि सीमापार दहशतवादाविरुद्ध भारतीय नागरिकांचे रक्षण करण्याचा सार्वभौम अधिकार स्वीकारण्याचा भारताचा दृढ संकल्प परराष्ट्रमंत्र्यांनी व्यक्त केला.

10.  उभय बाजूंनी नेतृत्व दरम्यान पार पडणाऱ्या आगामी वार्षिक शिखर परिषदेच्या तयारीवर चर्चा केली. ज्यामध्ये त्याची प्रमुख कामगिरी आणि फलनिष्पत्ती यांचा समावेश होता.  EAM यांनी महामहिम श्री. लावरोव्ह यांच्या सोबत संवाद सुरू ठेवण्यासाठी परस्पर सोयीस्कर तारखेला भारताला भेट देण्याचे आमंत्रण दिले.

**मॉस्को**

22 ऑगस्ट 2025